**वाचले :** १ मे. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांनी दिनांक ०६ डिसेंबर, २०२४ इ. रोजी प्रसिध्द् केलेली कनिष्ठ लिपीक संवर्गातील उमेदवार यांची निवड यादी.

२ मे. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांचेकडील आदेश क्रमांक प्रशासन ३६/ ४४ , दिनांक १८ जानेवारी, २०२५ अन्वये कनिष्ठ लिपीक संवर्गातील कर्मचारी यांचे बदली आदेश.

३ प्रभारी प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांचा दिनांक १७ जानेवारी, २०२५ इ. रोजीचा कार्यालयीन अहवाल व त्यावरील निम्नस्वाक्षरीत यांचा आदेश.

---

## आदेश क्रमांक प्रशासन ३६/४६

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, कोल्हापूर हे वर नमुद संदर्भ क्रमांक '१' नुसार कनिष्ठ लिपीक पदी निवड झालेले उमेदवार यांचे प्रथम नेमणुकीसंदर्भात खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहेत :—

| अनुक्रमांक | कनिष्ठ लिपीक निवड यादीमधील क्रमांक | उमेदवारांचे नाव व पत्ता | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | **१९** | **सिद्राम विलास खाडे**, राहणार एच नंबर १४६७, माळभाग, शिरढोण, तालुका शिरोळ, जिल्हा कोल्हापूर. | दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, **चंदगड** येथे श्री. सागर आर. भोई यांची बदली झालेने. |
| २ | **२०** | **ऋतिका रघुनाथ पाटील**, राहणार मुक्काम पोस्ट वडणगे, तालुका करवीर, जिल्हा कोल्हापूर. | दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, **कोल्हापूर** येथे श्री. विठ्ठल एस. कांबळे, कनिष्ठ लिपीक यांची बदली झालेने. |
| ३ | **२१** | **सुहानी कैलास गायकवाड,** राहणार चिपरी फाटा, रिलांयस पेट्रोलपंप जवळ, चिपरी तालुका शिरोळ, जिल्हा कोल्हापूर. | मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय, **कोल्हापूर** येथे श्री. भगवंत एस. पाटील, कनिष्ठ लिपीक यांची बदली झालेने. |

वर नमुद उमेदवार यांची नेमणूक संबधीत पदावर तात्पुरते / तदर्थ स्वरुपात करणेत येत आहे. उपरोक्त उमेदवारांची वेतननिश्चिती एस—६, वेतनबॅण्ड रक्कम रुपये १९,९००—६३,२०० या सुधारीत वेतन संरचनेत रुपये १९,९००/— या मुळ वेतनावर निश्चित करणेत येत आहे.

...२/—

वर नमुद उमेदवार यांनी यासोबत जोडणेत आलेला विहीत साक्षांकन नमुना भरुन कार्यालय प्रमुख यांचेमार्फत या कार्यालयाकडे तात्काळ पाठवून देणेचा आहे. उपरोक्त नमुन्यामध्ये उमेदवार यांनी आधार ओळखपत्र क्रमांक, पॅन कार्ड क्रमांक तसेच उमेदवारांच्या कुटुंबातील सदस्य परदेशात अध्ययन करीत असल्यास अथवा राहत असलेस त्याबाबतची माहिती समाविष्ट करणे अनिवार्य राहील.

**उपरोक्त उमेदवार यांनी दिनांक २० जानेवारी, २०२५ इ. रोजी अगर तेथून पुढे ०४ दिवसांत (सुट्टीचे दिवस वगळून) त्यांचे नेमणुकीचे ठिकाणी संबधीत न्यायालयात हजर राहावे अन्यथा त्यांची नेमणुक तदर्थ स्वरुपाची असलेने ती आपोआप रद्द होईल आणि कनिष्ठ लिपीक पदाचे निवड यादीमधून त्यांचे नाव कमी करणेत येईल याची नोंद घ्यावी.**

उपरोक्त उमेदवार यांना कामावर रुजू झालेनंतर सदर कार्यालयीन अटी व शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र व एकनिष्ठतेचे शपथपत्र द्यावे लागेल. तसेच त्यांना वैदयकीय तपासणीसाठी पाठविण्यात येईल व वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र अनिवार्य असेल. जर सेवेचा राजीनामा द्यावयाचा असेल तर या कार्यालयास १ महिन्याची आगाऊ लेखी सुचना दिली पाहिजे, किंवा तसे न करता राजीनामा दिलेस १ महिन्याच्या लेखी सुचनेऐवजी १ महिन्याचे वेतना इतके रोख रक्कम (वेतन संरचनेतील (Matrix) वेतन) या कार्यालयात जमा केली पाहिजे.

उमेदवारांनी नेमणूकीच्या ठिकाणी हजर होताना त्यांचा स्वत:चा मुळ फोटो असलेले ओळखपत्र (पॅन कार्ड, ड्रायव्हींग लायसेन्स, आधार कार्ड इ. यापैकी एक) यासह हजर व्हावे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अंनियो १००५/१२६/ सेवा—४, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ आणि शासन निर्णय क्रमांक अंनियो १००७/१८/सेवा—४, दिनांक ०७ जुलै, २००७ नुसार असे सुचित करणेत येते की, “१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नवीन परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु ठरेल मात्र सद्या

अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही."

| | | |
|---|---|---|
| जिल्हा व सत्र न्यायालय, | {} | ( कविता बि. अग्रवाल ) |
| कोल्हापूर — ४१६ ००६. | {} | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, |
| दिनांक : १८ जानेवारी, २०२५. | {} | कोल्हापूर. |

**प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर :—**

१ मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर.

1.A. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर.

२ मा. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, चंदगड.

३ अधीक्षक ( वित्त / प्रशासन ), जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर.

**प्रत माहितीकरीता व पुढील कार्यवाहीकरीता ईमेलव्दारे रवाना :—**

१ **सिद्राम विलास खाडे**, राहणार एच नंबर १४६७, माळभाग, शिरढोण, तालुका शिरोळ, जिल्हा कोल्हापूर. ( **sidramkhade@gmail.com** )

२ **ऋतिका रघुनाथ पाटील**, राहणार मुक्काम पोस्ट वडणगे, तालुका करवीर, जिल्हा कोल्हापूर. ( **salokherutika903@gmail.com** )

३ **सुहानी कैलास गायकवाड,** राहणार चिपरी फाटा, रिलांयस पेट्रोलपंप जवळ, चिपरी तालुका शिरोळ, जिल्हा कोल्हापूर. ( **suhanigaikwad2000@gmail.com** )

आदेशावरुन,

प्रभारी प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
कोल्हापूर.